**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभेत गदारोळ करणाऱ्या ८ विरोधी खासदारांचं निलंबन मागे
- शेतमालाचे हमीभाव यंदा वाढवले असून अजूनही हमीभावाने खरेदी चालू असल्याचं केंद्रीय कृषीमंत्र्यांचं निवेदन
- एलपीजी घेऊन नंदादेवी हे भारताचं दुसरं जहाज गुजरातमधल्या वाडीनार बंदरात दाखल
- ब्रसेल्स दौऱ्यात परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांची युरोपीयन युनियनच्या पदाधिकाऱ्यांशी महत्त्वाच्या विषयांवर चर्चा

**आणि**

- देशाच्या विविध भागात मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस होण्याची तसंच गारपिटीची शक्यता

**<><><><><><>**

लोकसभेत गदारोळ करणाऱ्या ८ विरोधी खासदारांचं निलंबन मागे घेण्यात आलं. भंडारा गोंदियाचे काँग्रेस खासदार प्रशांत पडोळे यांच्यासह ८ जणांना गैरवर्तन केल्याबद्दल अधिवेशन संपेपर्यंत सभागृहातून निलंबित केलं होतं. हे निलंबन तात्काळ मागे घ्यावं असा ठराव संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी मांडला आणि तो एकमताने संमत झाला. यासंदर्भात काल सभापती ओम बिरला यांनी बैठक बोलावली होती. त्यावेळी फलक झळकावणार नाही, एआय वापरलेली चित्र किंवा चित्रफिती सभागृहात दाखवणार नाही, एकंदर सभागृहाची प्रतिष्ठा राखली जाईल असं वर्तन करण्याचं आश्वासन सर्वपक्षीय नेत्यांनी दिलं असल्याची माहिती सभापतींनी दिली.

**<><><><><><>**

शेतकऱ्यांसाठीच्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेत केंद्र सरकारने सुधारणा केली असल्याची माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिली. विम्याचे दावे २१ दिवसात निकाली काढणं बंधनकारक असून त्यात उशीर झाला, तर कंपनीला १२ टक्के दराने व्याज द्यावं लागेल, असं त्यांनी स्पष्ट केलं....

**होल्ड- बाईट- चौहान**

शेतकऱ्यांना शेतमालाचा योग्य भाव मिळावा याकरता हमीभाव यंदा वाढवून दिले असून हमीभावाने खरेदी अजूनही सुरु असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज लोकसभेत सांगितलं.

**<><><><><><>**

सरकार वैद्यकीय विम्याला प्राधान्य क्षेत्र मानत असून २०३३ पर्यंत सर्वांना विमा संरक्षण मिळवून देण्यासाठी सरकार काम करत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. ग्रामीण भागात वैद्यकीय विम्याची उपलब्धता वाढवण्यासाठी सुरु असलेल्या विशेष योजनेअंर्तगत देशभरातल्या २५ हजार ग्रामपंचायतीमध्ये वैद्यकीय विमा उपलब्ध करून दिला जाणार आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

शिक्षण हे मानवी जीवनात प्रगतीची संधी निर्माण करणारं एक महत्त्वाचं साधन असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. त्या आज नवी दिल्लीत अक्षयपात्र फाऊंडेशनतर्फे आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. सक्षमीकरणाची प्रक्रिया शालेय शिक्षणापासून सुरू होते असं राष्ट्रपती म्हणाल्या...

**होल्ड.. बाईट - राष्ट्रपती**

केंद्र सरकारची प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना ही जगातली सर्वात मोठी मध्यान्ह भोजन योजना असल्याचं त्या म्हणाल्या. निरोगी आणि बलवान राष्ट्राच्या उभारणीसाठी हे एक महत्त्वाचं पाऊल आहे. सर्वांगीण पोषण हा भारतातल्या मुलांच्या प्राथमिक शिक्षणातला एक मोठा अडथळा या उपक्रमाच्या माध्यमातून दूर होत असल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या.

**<><><><><><>**

एलपीजी घेऊन येणारं नंदादेवी हे भारताचं दुसरं जहाज आज गुजरातमधल्या वाडीनार बंदरात दाखल झालं. कतारमधून निघालेलं हे जहाज होर्मूझची सामुद्रधुनी पार करून गुजरातमध्ये पोहोचलं. या जहाजावरचा सुमारे ४६ हजार मेट्रिक टन एलपीजी उतरवण्याचं काम सुरु झालं आहे. भारताची एलपीजी वाहक नौका शिवालिक ही कालच मुंद्रा बंदरात दाखल झाली आहे.  या दोन्ही जहाजांनी आणलेल्या एलपीजीमुळे देशाच्या वायुसाठ्यात मोठी भर पडली आहे.

**<><><><><><>**

परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांचा ब्रसेल्स दौरा संपन्न झाला. या दौऱ्यात त्यांनी युरोपियन परिषदेचे अध्यक्ष एन्टोनिओ कोस्टा, युरोपियन आयोगाच्या अध्यक्ष उर्सुला वोन डेर लेन आणि युरोपियन आयोगाच्या उपाध्यक्ष काजा कल्लास यांची भेट घेतली. त्यांनी युरोपियन युनियनमधल्या देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची भेट घेऊन काही जणांशी द्विपक्षीय चर्चा केली. या दरम्यान  भारत - युरोपियन युनियन मुक्त व्यापार करार संबंधी चर्चा झाल्याचं  जयशंकर यांनी सांगितलं. या करारामुळे प्रचंड आर्थिक क्षमता खुल्या होतीलच, यासोबतच दोन्ही पक्षांचा धोरणात्मक सहभाग देखील स्पष्ट होईल. दोन्ही पक्षांनी मुक्त व्यापार कराराच्या लाभाचा शोध घेण्यासाठी व्यापार आणि गुंतवणुक प्रोत्साहनासह विविध उपक्रमात सक्रिय सहभाग घेण्यावर चर्चा केली.

**<><><><><><>**

पश्चिम आशियातल्या तणावपूर्ण स्थितीमुळे जागतिक दळणवळण आणि नौवहन मार्गात निर्माण झालेल्या अडथळ्यांमुळे अडचणीत सापडलेल्या निर्यातदारांच्या मदतीसाठी बँकिंग उपाययोजना कराव्यात, अशी विनंती भारत चेंबर ऑफ कॉमर्सनं एका पत्राद्वारे भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांना केली आहे. पश्चिम आशिया हा भारतीय निर्यातदारांसाठी केवळ महत्त्वाचा बाजार नसून युरोप आणि आफ्रिकेकडे जाणाऱ्या मालासाठी महत्त्वाचा मार्ग आहे, असं या पत्रात म्हटलं आहे. बँकांना अधिक सहाय्यक कर्जविषयक धोरण अवलंबण्यास प्रोत्साहित करावं असं आवाहन या पत्रातून रिझर्व्ह बँकेला करण्यात आलं आहे.

<><><><><>

विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने पश्चिम बंगालमध्ये केलेल्या प्रशासकीय बदल्यांवर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पत्र लिहून नाराजी व्यक्त केली आहे. विधानसभा निवडणूक जाहीर झाल्यानंतर काही तासांतच प्रशासनातल्या ज्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या, त्यांच्याविरुद्ध गैरवर्तन, निष्काळजीपणा किंवा निवडणूक प्रक्रियेचं उल्लंघन केल्याचा कोणताही आरोप नव्हता. त्यामुळे त्यांच्या बदलीचा निर्णय एकतर्फी आहे. लोकशाही मूल्यांकडे दुर्लक्ष केल्यास निवडणूक आयोगाची विश्वासार्हता कमी होईल, असं बॅनर्जी आपल्या पत्रात म्हणाल्या आहेत.

दरम्यान, पुद्दुचेरीमध्येही तामिळनाडूप्रमाणाचे २३ एप्रिलला मतदान घेण्यात यावं, अशी विनंती काँग्रेसने निवडणूक आयोगाला केली आहे. ते शक्य नसल्यास तामिळनाडूच्या मतदानाची तारीख बदलून ती पुद्दुचेरीप्रमाणे ९ एप्रिल करण्यात यावी, असंही काँग्रेसने आपल्या विनंतीत म्हटलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात गॅस टंचाईचा मोठ्या प्रमाणात सामना करावा लागत असल्याचा मुद्दा नाना पटोले यांनी विधानसभेत उपस्थित केला. याबाबत सरकारने काल

विधानसभेत निवेदन करणं अपेक्षित होतं, ते कधी करणार असा प्रश्न पटोले यांनी विचारला. तसंच राज्यातील गॅस टंचाईची स्थिती  सभागृहात सविस्तर मांडण्याची परवानगी त्यांनी मागितली. अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ती नाकारली मात्र सरकारने सभागृहात निवेदन करण्याचे निर्देश दिले. बोलण्याची परवानगी नाकारल्यामुळे आणि सरकारने सभागृहात निवेदन न दिल्यामुळे विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सरकारविरोधी घोषणाबाजी करत सभात्याग केला.

**<><><><><>**

ओडिशातल्या कटक इथल्या एस सी बी रुग्णालयाला लागलेल्या आगीत मरण पावलेल्यांची संख्या ११ वर पोहोचली आहे. आगीत होरपळलेल्या एकाचा आज मृत्यू झाला. मृत व्यक्तीला या रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचारांसाठी काही दिवसांपूर्वी दाखल करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधे ट्यूलिपचा बहर सुरु झाला आहे.  श्रीनगरमधली ट्युलिप बाग काल पर्यटकांसाठी खुली करण्यात आली. यावर्षी सुमारे १८ लाख ट्युलिपच्या ७० हून अधिक प्रकारांसह, एक लाख  फुलझाडं ही फुलली आहेत.

**<><><><><>**

ज्येष्ठ लेखिका आणि कवयित्री आसावरी काकडे यांचं पुण्यात अल्पशा आजारानं निधन झालं. त्या ७७ वर्षांच्या होत्या. मराठी आणि हिंदी भाषेत साहित्यरचनेखेरीज त्यांनी दोन्ही भाषामधलं उत्तम साहित्य परस्परात अनुवादित केलं होतं. त्यांच्या कविता शालेय अभ्यासक्रमातही समाविष्ट झाल्या होत्या. चंद्रप्रकाश देवल यांच्या बोलो माधवी या काव्यसंग्रहाचा त्यांनी केलेल्या अनुवादाला साहित्य अकादमीचा अनुवादासाठीचा पुरस्कार मिळाला होता. राज्यशासनाच्या साहित्य पुरस्कारांसह अनेक पुरस्कार त्यांना मिळाले होते.

**<><><><><>**

देशाच्या विविध भागात मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. ईशान्येकडच्या राज्यात तुरळक ठिकाणी तसंच हिमाचल प्रदेश, झारखंड, आंध्रप्रदेश , तेलंगण, ओदिशा, पश्चिम बंगाल, आणि महाराष्ट्रातही वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट हवामानशास्त्रविभागाने जारी केला आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता असून शेतकऱ्यांनी त्यादृष्टीनं नियोजन करावं असं राज्यशासनाच्या कृषी विभागाने सांगितलं आहे.

उत्तराखंडमधे पावसाप्रमाणेच हिमवृष्टीची शक्यता आहे. हिमाचल प्रदेशात अनेक उंचावरच्या भागात हिमवृष्टी होत असून इमारती, झाडं आणि रस्त्यांवर बर्फाची चादर पसरली आहे. पश्चिम बंगालमधे कालपासून वादळी वाऱ्यांमुळे जनजीवन प्रभावित झालं आहे. अनेक ठिकाणी पाऊसही पडत आहे. अनेक ठिकाणी विजेचे खांब, झाडं कोसळली आहे.

//<><><><><><>//